■ वर्ष : ३२ ■ अंक : २२० ■ पृष्ठ : ८ ■ किंमत २.०० रु. ■ RNI No - 67555 ■ www.epaper.bhandarapatrika.com

ग्रामीण विदर्भातील सर्वाधिक खपाचे मराठी दैनिक

# भंडारा पत्रिका

शुक्रवार : ०९ ऑक्टोंबर २०२६ | भंडारा | ● E-mail:- bhn.patrika@gmail.com

## घरासमोरून दुचाकी चोरी

**गोंदिया :** तुमखेडा खुर्द येथे घरासमोर ठेवलेली होंडा कंपनीची शाईन १२५-एमएचआर-यूएमईजी मोटारसायकल अज्ञात चोरट्याने लंपास केली. ही घटना ५ ऑक्टोबरच्या रात्री ११:३० ते ६ ऑक्टो.च्या सकाळी ६ वाजताच्या दरम्यान घडली. महेंद्र अशोक बावणे (२८) रा. तुमखेडा खुर्द, ता. जि. गोंदिया यांनी मोटारसायकल घरासमोरील पोर्चमध्ये ठेवली होती. सकाळी पाहणी केली असता ५० हजार रुपये किमतीची दुचाकी चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी गोंदिया ग्रामीण पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

## १६ ऑक्टों. पासून राज्यात पाणी कपात

**मुंबई :** अलनिनोच्या प्रभावामुळे राज्यात यंदा पर्जन्यमानात मोठी घट झाली असून राज्यातील जलसाठा मर्यादित आहे. या संभाव्य दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करण्यासाठी जलसंपदा विभागाने ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंतचे पाण्याचे धरणनिहाय व वापरनिहाय अत्यंत सूक्ष्म नियोजन केले आहे. राज्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कोणतीही टंचाई भासू नये, यासाठी पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून १६ ऑक्टोबर २०२६ पासून सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये किमान १० टक्के पाणीकपात लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

# पाण्याअभावी धानशेती करपली, शेतकऱ्याने मृत्यूला कवटाळले

■ पालकमंत्र्यांसमोर अश्रू ढाळत मांडली होती व्यथा ■ कुटुंबाला एक कोटींची मदत व मुलाला शासकीय नोकरीचे लेखी आश्वासन





**भंडारा पत्रिका / प्रतिनिधी**

**भंडारा :** मोहाडी तालुक्यातील धोप येथील शेतकरी राजेंद्र अंबर सपाटे यांचा गुरुवारी ८ ऑक्टो. ला विहिरीत मृतदेह आढळून आला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्यासमोर अश्रू ढाळत मांडणाऱ्या या शेतकऱ्यांने आत्महत्या केल्याने दुष्काळाच्या संकटाची तीव्रता पुन्हा अधोरेखित झाली आहे.

माज्या शेतात पाणी नाही,धान मरणाच्या अवस्थेत आहे. शेतीचे पंचनामे त्वरित करून मोबदला द्या साहेब, मुलांचे शिक्षण आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा? काहीतरी करा साहेब, नाहीतर आत्महत्येशिवाय पर्याय राहणार नाही. अशी व्यथा याच आठवड्यात पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्यासमोर अश्रू ढाळत मांडणाऱ्या सपाटे यांच्याकडे सुमारे साडेचार ते पाच एकर शेती होती. यंदा पावसाने पाठ फिरवल्याने धानपीक करपले असून, जमिनीला भेगा पडल्या होत्या. शेतीवरच कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि मुलांचे उच्च शिक्षण अवलंबून असल्याने आर्थिक विवंचना वाढली होती.

३ ऑक्टोबर रोजी पालकमंत्री डॉ. भोयर यांच्या दुष्काळ पाहणी दौऱ्यात सपाटे यांनी रडत-रडत आपली व्यथा मांडली होती. यावेळी त्यांनी 'मी लिहून देतो; मात्र माझ्या फाईली फेकतात,' असेही सांगितल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे यापूर्वी प्रशासनाकडे केलेल्या अर्जांवर काय कार्यवाही झाली, याची चौकशी करण्याची मागणी आता होत आहे.

गुरुवारी सकाळी शेतातील विहिरीत सपाटे यांचा मृतदेह आढळला. घटनेची माहिती मिळताच अधिकारी व पोलिसांचा फौजफाटा घटनास्थळी दाखल झाला. डेप्युटी कलेक्टर जाधव, तहसीलदार प्राजक्ता बुरांडे, कृषी अधिकारी सुनील भड-के,आदींनी परिस्थिती हाताळली.

कुटुंबीय व ग्रामस्थांनी एक कोटी रुपयांची आर्थिक मदत आणि कुटुंबातील एका मुलाला शासकीय नोकरी देण्याचे लेखी आश्वासन मिळेपर्यंत मृतदेह बाहेर काढू न देण्याची भूमिका घेतली. प्रशासनाने पालकमंत्र्यांशी संपर्क साधल्यानंतर मागण्या मान्य करण्याबाबत लेखी आश्वासन देण्यात आले. त्यानंतर मृतदेह विहिरीतून बाहेर काढून शवविच्छेदनासाठी तुमसर उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला.

घटनेचा पुढील तपास आंधळगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार नितीन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### जर अधिकाऱ्यांनी दखल घेतली असती तर...

पालकमंत्र्यांसमोर प्रत्यक्ष व्यथा मांडूनही त्यानंतर तातडीने मदत मिळाली का, याचा तपास होणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. 'वेळीच दखल घेतली असती तर कदाचित हा अनर्थ टळला असता. परंतु प्रशासनाच्या दिरंगाईमुळे आज शेतकऱ्याला आपले जीव गमवावे लागले. मोहाडी तालुक्यातील शेतकऱ्यांचे पंचनामे करून सरसकट मदत जाहीर करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

### आता तरी सरसकट पंचनामे करावे

राजेंद्र सपाटे यांच्या मृत्यूने मोहाडी तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची व्यथा पुन्हा ऐरणीवर आली आहे. पाण्याअभावी धानपिके करपत असून अनेक शेतजमिनींना भेगा पडल्या आहेत. त्यामुळे प्रशासनाने कागदोपत्री पाहणी न करता प्रत्यक्ष शेतात जाऊन सरसकट पंचनामे करावेत. नुकसानग्रस्त प्रत्येक शेतकऱ्याला तातडीने आर्थिक मदत देऊन पुढील संकट टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

धोप येथील शेतकरी राजेंद्र अमर सपाटे यांच्या मृत्यूची शासनाने तातडीने दखल घ्यावी. पालकमंत्र्यांच्या दुष्काळ पाहणी दौऱ्यात सपाटे यांनी प्रत्यक्ष आपली व्यथा मांडली होती. त्यानंतरही त्यांच्या प्रश्नांवर अपेक्षित कार्यवाही झाली नसेल, तर ही बाब गंभीर आहे. पालकमंत्र्यांचा दौरा नेमका कशासाठी होता, असा प्रश्न निर्माण होतो. सपाटे यांच्या ह्यफाईली फेकल्या जातातञ्च या तक्रारीचीही चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी. कुटुंबाला तातडीने एक कोटी रुपयांची मदत द्यावी आणि एका सदस्याला शासकीय नोकरी देण्याचे आश्वासन पूर्ण करावे. या घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारून पालकमंत्र्यांनी राजीनामा द्यावा. तसेच मोहाडी-तुमसरमधील संकटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी.

**चरण वाघमारे,**
**माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष,**
**राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष, भंडारा**

## ढिवरवाड्यात जखमी अस्वलाचे यशस्वी रेस्क्यू

### वनविभागाची तत्परता, उपचारासाठी गोरेवाडा येथे रवाना

**भंडारा पत्रिका / प्रतिनिधी**

**गोंदिया :** नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रांतर्गत नागझिरा खंडातील कोका वन्यजीव अभयारण्य परिसरात ढिवरवाडा गावालगतच्या स्मशानभूमी परिसरात जखमी अवस्थेत आढळलेल्या अस्वलाचे वनविभागाने यशस्वी रेस्क्यू केले. ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.१७ वाजता सहवनक्षेत्र कोका, नियतक्षेत्र डोंगरदेव, कक्ष क्रमांक १६२ येथे ही कार्यवाही करण्यात आली. अस्वलाच्या मागील उजव्या पायाला गंभीर दुखापत झाल्याचे प्राथमिक तपासणीत आढळून आले असून, पुढील उपचारांसाठी त्याला गोरेवाडा येथील वन्यजीव उपचार केंद्रात पाठविण्यात आले आहे.



ढिवरवाडा गावालगतच्या स्मशानभूमी परिसरात अस्वल भ्रमण करत असताना स्थानिक ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. अस्वल जखमी अवस्थेत असल्याचे लक्षात येताच ग्रामस्थांनी तातडीने वनरक्षक आकाश जाधव यांच्याशी संपर्क साधून वन्यजीव विभागाला घटनेची माहिती दिली. वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार आणि निर्धारित प्रमाणित कार्यपद्धतीचे पालन करत वनविभागाने जखमी अस्वलाला सुरक्षितरीत्या जेरबंद करण्याची मोहीम राबविली. क्षेत्र संचालक पियुषा जगताप आणि उपसंचालक तुषार ढमढेरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

मोहिमेत सहायक वनसंरक्षक सुहास कांबळे, वनपरिक्षेत्र अधिका-री सुरजकुमार गोखले, मानद वन्यजीव रक्षक भंडारा शाहीद खान, कंत्राटी पशुवैद्यकीय अधिकारी मेघराज तुलावी, क्षेत्र सहाय्यक मेश्राम, बिट रक्षक जाधव, जलद प्रतिसाद पथकातील शूटर व कर्मचारी तसेच स्थानिक ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घेतला.

दरम्यान, अथक प्रयत्नांनंतर अस्वलाला सुरक्षितरीत्या जेरबंद करण्यात आले. यानंतर अस्वलाची प्राथमिक पशुवैद्यकीय तपासणी करून पुढील आवश्यक औषधोपचारासाठी गोरेवाडा येथील वन्यजीव उपचार केंद्रात हलविण्यात आले.

## गोंदियाच्या धमदीटोल्यात गांजाची शेती उद्ध्वस्त

**भंडारा पत्रिका / प्रतिनिधी**

**देवरी :** देवरी तालुक्यातील धमदीटोला येथे घराच्या परसबागेत गांजाची शेती करून विक्री करणाऱ्या तस्करावर चिचगड पोलिसांनी धडक कारवाई करून त्याच्या ताब्यातून गांजाच्या रोपट्यांसह १ लाख ६२ हजार ७५० रुपयांचा ३.२५० किलो ग्रॅम गांजा जप्त केला आहे. हि कारवाई बुधवारी ७ ऑक्टोबर रोजी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास करण्यात आली. आत्माराम माधो मडावी (५४) रा. धमदीटोला असे आरोपीचे नाव असून बुधवारी सायंकाळी त्यास अटक करण्यात आली आहे.

### गांजाच्या रोपट्यांसह १.६२ लाखांचा गांजा जप्त



मिळालेल्या माहितीनुसार, धमदीटोला/मिसिपीरी येथे एका इसमाने आपल्या राहत्या घराच्या मागील परिसरात गांजाच्या रोपांची लागवड करून विक्री करीत असल्याची गोपनीय माहिती चिचगड पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापामार कारवाई केली. कारवाईदरम्यान आरोपी आत्माराम मडावी याच्या राहत्या घराच्या परसबागेत अंमली पदार्थ गांजाच्या लहान-मोठ्या १७ रोपट्यांची लागवड केलेली आढळून आली.

पोलिसांनी सदर गांजाची रोपटे व त्यापासून मिळालेला गांजा असा एकूण ३.२५० किलो ग्रॅम मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी आरोपी आत्माराम मडावीच्या विरोधात कायदेशीर कार-वाई करून गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास अटक करण्यात आली आहे. चिचगड पोलिसांच्या या कारवाईमुळे परिसरात अवैध गांजा लागवड करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. ही कारवाई सहाय्यक पोलिस निरीक्षक जनार्दन हेगडकर यांच्या मार्गदर्शनात चिचगड पोलिस पथकाने केली

## नशा आणणाऱ्या औषधांचा २२ लाखांचा साठा जप्त

**भंडारा पत्रिका / प्रतिनिधी**

**नागपूर:** अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (कृती) आणि अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाने नागपूर येथे बुधवा-री संयुक्त तपासणी मोहीम राबवून शहरातील दोन औषध प्रतिष्ठानांवर कठोर कायदेशीर कारवाई केली. या कारवाईत विनापरवाना नशा आणणाऱ्या तब्बल २२ लाख ३ हजार ७४४ रुपयांचा औषध साठा जप्त करण्यात आला.

केंद्र व राज्य सरकारच्या अंमली पदार्थ नियंत्रण उद्दिष्टांनुसार १ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत नागपूर विभागात औषध दुकाने व फार्मसींची विशेष तपासणी मोहीम राबवली जात आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून बुधवारी पथकाने शहरातील दोन संशयास्पद प्रतिष्ठानांची अचानक तपासणी केली.

भारत माता चौक, जागनाथ बुधवारी येथील फीनेक्स मेडीक्राफ्टवर या पथकाने औषध साठ्याची तपासणी केली असता, संबंधित मालकाकडे औषध विक्रीचा कोणताही वैध परवाना आढळून आला नाही. नियमांचे थेट उल्लंघन झाल्याने पथकाने दुकानातील २२ लाख ३ हजार ७४४ रुपये किमतीचा संपूर्ण औषधी साठा तात्काळ जप्त केला.

## ग्रामीण रुग्णालय लाखांदूर येथे एकाच दिवशी २३ शस्त्रक्रिया यशस्वी

**भंडारा पत्रिका / प्रतिनिधी**

**लाखांदूर :** शासनाच्या 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना' आणि 'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत ग्रामीण रुग्णालय, लाखांदूर येथे आज दिनांक ८ ऑक्टोबर २०२६ रोजी विशेष आरोग्य मोहिमेचे आयोजन करण्यात आले. या मोहिमेत विविध आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांवर एकूण २३ शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या.



या विशेष मोहिमेदरम्यान हायड्रोसील (Hydrocele), हार्निया (Hernia), ॲपेंडिक्स (Appen-dix), शरीरावरील इतर गाठी, स्तनांतील गाठी तसेच कुटुंब नियोजन यांसारख्या महत्त्वाच्या शस्त्रक्रियांचा समावेश होता.

ही संपूर्ण मोहीम भंडारा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संदीप कुमार गजभिये यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली तसेच ग्रामीण रुग्णालय लाखांदूरचे शल्यचिकित्सक तथा वैद्यकीय अधीक्षक डॉ. दत्तात्रय ठाकरे यांच्या अविरत प्रयत्नातून व दूरदृष्टीपूर्ण नियोजनातून यशस्वी झाली.

शस्त्रक्रिया यशस्वी करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने अहोरात्र परिश्रम घेतले.

यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. दत्तात्रय ठाकरे, डॉ. शेखर नाईक, बधिर-ीकरण तज्ञ डॉक्टर सुमित मेश्राम. स्त्रीरोगतज्ञ डॉ. रोशनी राऊत +ठाकरे ) तसेच या मोहिमेत ग्रामीण रुग्णालय लाखांदूर येथील सर्व अधिपरिचारिका (Nursing Staff), कक्ष सेवक आणि इतर सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

चार आठवड्यात एकूण ५८ शस्त्रक्रिया पार पडले. सर्व रुग्णांची प्रकृती सध्या उत्तम व स्थिर असून त्यांच्यावर पुढील आवश्यक उपचार व देखरेख सुरू आहे. ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना एकाच छताखाली मोफत व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध झाल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

## भंडाऱ्यात काँग्रेसचा 'ब्लॅक डे'

◆ राहुल गांधींसह इंडिया आघाडीच्या नेत्यांवरील कारवाईचा निषेध ◆ काळ्या फिती लावून आंदोलन

**भंडारा पत्रिका / प्रतिनिधी**

**भंडारा :** काँग्रेस नेते खा.राहुल गांधींसह इंडिया INDIA आघाडीच्या नेत्यांवरील कारवाईच्या निषेधार्थ ८ ऑक्टोबर हा 'Black Day for Indian Democracy' म्हणून पाळण्यात आला. त्यानिमित्त भंडारा जिल्हा काँग्रेस कमिटी, भंडारा शहर काँग्रेस कमिटी आणि भंडारा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने गांधी चौक येथे निषेध आंदोलन करण्यात आले. काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काळ्या फिती लावून केंद्र सरकारच्या धोरणांचा तसेच दिल्लीतील आंदोलना दरम्यान झालेल्या पोलिस कारवाईचा निषेध नोंदविला.



निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीसह मतदार यादीतील विशेष सखोल पुनरावलोकन प्रक्रिया अर्थात Special Intensive Revision (SIR) संदर्भातील प्रश्न उपस्थित करत राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीच्या खासदारांनी ६ आणि ७ ऑक्टोबर रोजी दिल्लीमध्ये आंदोलन केले. ७ ऑक्टोबर रोजी जंतर-मंतरक-डे जात असताना राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्यासह विरोधी पक्षांच्या काही नेत्यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे काँग्रेसकडून सांगण्यात आले. या कार-वाईच्या निषेधार्थ देशभर 'ब्लॅक डे' पाळण्याचे आवाहन करण्यात आले होते.

भंडाऱ्यातील आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी 'लोकशाही वाचवा, संविधान वाचवा' अशा घोषणा देत निवडणूक प्रक्रिया आणि मतदारांच्या अधिकारांबाबत पारदर्शकता राखण्याची मागणी केली.

भंडारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मुकुंद साखरकर म्हणाले की, लोकशाही व्यवस्थेत निवडणूक प्रक्रिया, मतदार यादी आणि संविधानिक संस्थांच्या कामकाजाबाबत प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार विरोधी पक्षांना आहे. राहुल गांधी आणि इंडिया आघाडीच्या नेत्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर पारदर्शकपणे उत्तरे मिळणे आवश्यक आहे. प्रश्न विचारणाऱ्या आवाजाला दडपण्याऐवजी त्या प्रश्नांवर चर्चा होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, हे आंदोलन केवळ काँग्रेस पक्षाचा कार्यक्रम नसून संविधान, लोकशाही आणि मतदारांच्या अधिकारांशी संबंधित मुद्यांकडे लक्ष वेधण्यासाठी करण्यात आले आहे. निवडणूक प्रक्रियेबाबत जनतेच्या मनात निर्माण होणाऱ्या प्रश्नांचे संबंधित संस्थांनी समाधानकारक स्पष्टीकरण द्यावे.

धनराज साठवणे यांनीही निवडणूक प्रक्रियेबाबत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांवर चर्चा होण्याची गरज व्यक्त केली. विरोधी पक्षांच्या आंदोलनाकडे केवळ राजकीय संघर्ष म्हणून न पाहता त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर चर्चा होणे आवश्यक आहे. मतदार यादी, रक्क्र आणि निवडणूक प्रक्रियेबाबत पारदर्शकता व स्पष्टता असणे लोकशाहीसाठी महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, काँग्रेसकडून दिल्लीतील कारवाईचा निषेध करण्यात आला असला तरी निवडणूक आयोग आणि भाजपकडून काँग्रेसच्या आरोपांना नकार देण्यात आला आहे. निवडणूक आयोगाने आपल्या कार्यपद्धतीबाबत कायदेशीर व निर्धारित प्रक्रियेनुसार काम सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे.

आंदोलनात मुकुंद साखरकर, जिया पटेल, धनराज साठवणे, अभिजीत वंजारी, रिजवान काझी, राजकपूर राऊत, मनोज बागडे, वैभव मेंढे, नरेंद्र साकोरे, किशोर राऊत, नवाब पटेल, हिरामण लांजेवार, आयुब पटेल, शमीम शेख, इम्रान पटेल, शीलवंत मडामे, जीवन कावडे, सुरेश काटेखाये, फारुख खान, भाऊ कातोरे, सुरेश गुंनाडे, प्रमोद मानापुरे, पवन वंजारी, विनीत देशपांडे, मधुकर कुंभारे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अड्याळ महसूल मंडळात पीक नुकसानीचे सर्व्हे

**अड्याळ :** पवनी तालुक्यात दुष्काळ जाहीर झाल्यानंतर महसूल मंडळनिहाय पीक नुकसानीचे सर्वेक्षण सुरू झाले आहे. अड्याळ मंडळात दीर्घ मुदतीच्या धान पिकाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. १४० ते १४५ दिवसांच्या या पिकाची सद्यस्थिती समाधानकारक असली तरी पुढील १५ ते ३० दिवसांत पाणी, रोगराई व हवामानाचा परिणाम उत्पादनावर होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली. ऑक्टोबर अखेरीस सर्वेक्षण करण्याची मागणी शेतकरी तथा सरपंच सुरेंद्र आयतुलवार यांनी केली. यावेळी महसुल अधिकारी शरद गाढवे, तलाठी कलेवाडा, संदीप मोडघरे, प्रेम खेकारे, ग्राम विकास अधिकारी अरविंद लांजेवार, चेतन बावनकुळे आदी उपस्थित होते.

## टिप्परच्या धडकेत युवक ठार

**भंडारा पत्रिका / प्रतिनिधी**

**गोंदिया :** रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या युवकाला भरधाव टिप्परने दिलेल्या धड-केत युवकाचा मृत्यू झाल्याची घटना गोंदिया तालुक्यातील खातिया येथे ६ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास घडली. मनोज धनराज चुटे (वय ३५) रा. करंजी, ता. आमगाव असे अपघातात ठार झालेल्या युवकाचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार मनोज चुटे हा करंजी येथील रहिवासी असून तो खातिया येथे श्राद्धासाठी आपल्या नातेवाईक-ाकडे आला होता. मंगळवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास तो गांधी चौक परिसरात रस्त्याच्या बाजूने उभा होता.

दरम्यान विरुद्ध दिशेने येणाऱ्या टिप्पर क्रमांक एमएच ३५ एजे ४०९० च्या चालकाने टिप्पर निष्काळजीपणे चालवून मनोजला धडक दिली. यात तो गंभीर जखमी झाला. त्याला उपस्थित नागरिकांनी गंभीर अवस्थेत १०८ रुग्णवाहिका मागवून उपचारासाठी गोंदिया येत नेत असताना वाटेतच त्याचा मृत्यू झाला. त्याच्या पश्चात दोन मुली, पत्नी, आई-वडील असा बराच मोठा आप्त परिवार आहे. रावणवाडी पोलिसांनी टिप्पर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# सर्व्हिस वायरने घेतला पेट; अर्ध्या सिल्लीत अडीच तास वीजपुरवठा खंडित

◆ शॉर्टसर्किटमुळे घराच्या मीटरपर्यंत धावली आगीची झळ
◆ सिल्लीग्रामवासीयांच्या सतर्कतेने मोठा अनर्थ टळला



**भंडारा पत्रिका/वार्ताहर**

**सिल्ली :** येथील रहिवासी महादेव फत्तु चोपकर यांच्या घराकडे जाणाऱ्या विजेच्या सर्व्हिस वायरला बुधवारी रात्री सुमारे ९ वाजताच्या सुमारास अचानक आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. शॉर्टसर्किटमुळे सर्व्हिस वायरने पेट घेत आगीच्या ज्वाळा थेट घराच्या मीटरपर्यंत पोहोचल्या. ग्रामस्थांनी प्रसंगावधान राखत तत्काळ वीजपुरवठा बंद केल्याने संभाव्य मोठी दुर्घटना टळली. मात्र, या घटनेमुळे अर्ध्या सिल्लीत तब्बल अडीच ते तीन तास वीजपुरवठा खंडित राहिला.

मिळालेल्या माहितीनुसार, महादेव चोपकर यांच्या घराच्या मीटरकडे वीज खांबावरून येणाऱ्या सर्व्हिस वायरमध्ये रात्री अचानक शॉर्टसर्किट झाले. काही क्षणांतच वायरने पेट घेतला. आगीच्या ज्वाळा वायरच्या मार्गाने पुढे सरकत थेट घराच्या मीटरपर्यंत पोहोचल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. वायरमधून ठिणग्या उडत असल्याने नागरिकांनी अधिक सतर्कता बाळगत तातडीने वीजपुरवठा बंद करण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी गावातील वीज हेल्पर भुरे यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत डीपीवरील ग्रीप काढून संबंधित भागाचा वीजपुरवठा बंद केला. त्यामुळे वायरमधील वीजप्रवाह थांबविण्यात आला आणि आगीचा धोका कमी झाला. वेळीच वीजपुरवठा बंद करण्यात आला नसता तर आग घरातील इतर भागात तसेच शेजारील घरांपर्यंत पसरण्याची शक्यता होती. त्यामुळे मोठा आगडोंब उसळून जीवित व वित्तहानी होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर गावातील नागरिकांना बराच वेळ अंधारात राहावे लागले. रात्री उशिरापर्यंत दुरुस्तीचे काम सुरू होते. अखेर रात्री १२ ते १ वाजताच्या सुमारास नवीन फेज टाकण्यात आल्यानंतर वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. त्यामुळे सुमारे अडीच ते तीन तास संपूर्ण गाव अंधारात राहिले.

**महावितरणच्या अधिकाऱ्यांवर ग्रामस्थांचा संताप**

घटनेनंतर तातडीच्या मदतीसाठी ग्रामस्थांनी मानेगाव येथील महावितरण कार्यालयाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, पाच ते सहा वेळा फोन करूनही संबंधित अधिकारी फोन उचलत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित होऊन घराच्या सर्व्हिस वायरला आग लागल्यासारखी गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यानंतरही अधिकारी संपर्कात उपलब्ध नसणे ही बाब चिंताजनक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

वीजवाहिन्यांमध्ये बिघाड झाल्यास किंवा शॉर्टसर्किटसारखी आपत्कालीन घटना घडल्यास नागरिकांना तातडीने महावितरणच्या यंत्रणेशी संपर्क साधता येणे आवश्यक आहे. मात्र, अधिकारी फोनवर उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. रात्रीच्या वेळी जबाबदारीपासून दूर राहणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

सर्व्हिस वायरची नियमित तपासणी, जीर्ण झालेल्या वायर बदलणे आणि आपत्कालीन परिस्थितीत तातडीने प्रतिसाद देण्यासाठी महावितरणने प्रभावी यंत्रणा उभी करावी, अशीही मागणी आता जोर धरू लागली आहे.

# घड्याळी शिक्षकांना कामावरून काढू नका; अन्यथा तीव्र आंदोलन

❑ आझाद समाज पार्टीचा जिल्हा परिषद प्रशासनाला इशारा
❑ २० वर्षांपासून भरती नाही, अल्प मानधनावर शिक्षकांची सेवा

**भंडारा पत्रिका/प्रतिनिधी**

**भंडारा :** जिल्हा परिषद भंडारा प्रशासनाने तासिका तत्त्वावर कार्यरत असलेल्या घड्याळी शिक्षकांना कमी करण्याबाबत आठ दिवसांपूर्वी पत्र काढल्याने शिक्षकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. प्रशासनाचा हा निर्णय तात्काळ मागे घेण्यात यावा, अन्यथा आझाद समाज पार्टी (कांशीराम)च्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पक्षाचे जिल्हाध्यक्ष ग्यानचंद जांभुळकर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

> 'वीस वर्षांपासून शिक्षक भरती झालेली नाही. या काळात घड्याळी शिक्षकांनी अल्प मानधनावर काम करून जिल्हा परिषदेच्या शाळा जगवल्या आहेत. आता त्यांनाच कामावरून कमी करणे हा त्यांच्यावर अन्याय आहे. प्रशासनाने आठ दिवसांपूर्वी काढलेला निर्णय तात्काळ मागे घ्यावा. अन्यथा आझाद समाज पार्टी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल.'
>
> **– ग्यानचंद जांभुळकर,**
> जिल्हाध्यक्ष, आझाद समाज पार्टी, भंडारा

भंडारा जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत एकूण ३२ हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालये आहेत. मात्र, गेल्या सुमारे २० वर्षांपासून शिक्षकांची नियमित भरती झालेली नसल्याचा आरोप आझाद समाज पार्टीने केला आहे. परिणामी, जिल्हा परिषदेच्या शाळांमधील अध्यापनाची जबाबदारी मोठ्या प्रमाणात घड्याळी शिक्षकांवर येत आहे. अत्यंत अल्प मानधनावर हे शिक्षक गेल्या अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे काम करीत आहेत.

घड्याळी शिक्षकांना नियमित शिक्षकांप्रमाणेच अध्यापनासोबतच विविध शैक्षणिक कामांची जबाबदारी पार पाडावी लागते. विद्यार्थ्यांना शिकविणे, पेपर तपासणे, निकाल तयार करणे तसेच शाळेच्या शैक्षणिक कामकाजात योगदान देणे अशी अनेक कामे ते करीत असल्याचे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. असे असतानाही त्यांच्या मानधनात मोठी तफावत असल्याने त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

सध्या हायस्कूलसाठी घड्याळी शिक्षकांना केवळ ५२ रुपये प्रतितास, तर कनिष्ठ महाविद्यालयासाठी ७२ रुपये प्रतितास इतके तुटपुंजे मानधन मिळत असल्याचा दावा करण्यात आला आहे. एवढ्या अल्प मानधनात संसाराचा गाडा चालविणे अत्यंत कठीण असतानाही हे शिक्षक वर्षानुवर्षे शिक्षण व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी काम करीत आहेत. त्यामुळे अशा शिक्षकांना कामावरून कमी करण्याचा निर्णय अन्यायकारक असल्याची भूमिका आझाद समाज पार्टीने घेतली आहे.

**शिक्षकांची कमतरता असताना कपात कशासाठी?**

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये आधीच शिक्षकांची मोठी कमतरता असल्याचे पक्षाचे म्हणणे आहे. अनेक विषयांसाठी पुरेसे शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत आहे. शिक्षकांची कमतरता दूर करण्याऐवजी तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या शिक्षकांनाच कमी केले जात असेल, तर त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होणार आहे.

शिक्षकांची संख्या कमी असल्यामुळे पालकांमध्येही असंतोष वाढत असून, अनेक पालक आपल्या पाल्यांना जिल्हा परिषद शाळांमधून काढून खासगी शाळांमध्ये प्रवेश देत असल्याचे चित्र आहे. अशा परिस्थितीत घड्याळी शिक्षकांना कमी करण्याचा निर्णय घेतल्यास जिल्हा परिषद शाळांची शैक्षणिक व्यवस्था आणखी कमकुवत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाला जिल्हा परिषदेच्या शाळा सक्षम करायच्या आहेत की त्या हळूहळू मोडकळीस आणायच्या आहेत, असा सवाल पक्षाने उपस्थित केला आहे.

**प्रशासनाने निर्णय मागे घ्यावा**

गेल्या २० वर्षांपासून नियमित शिक्षक भरती झालेली नसताना घड्याळी शिक्षकांनी जिल्हा परिषदेच्या शाळांमधील अध्यापन व्यवस्था टिकवून ठेवली आहे. त्यामुळे त्यांच्या सेवेचा विचार करून प्रशासनाने त्यांना कामावरून कमी करण्याचा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी आझाद समाज पार्टीने केली आहे.

प्रशासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास जिल्ह्यातील घड्याळी शिक्षकांच्या प्रश्नावर आझाद समाज पार्टी रस्त्यावर उतरून आंदोलन करेल. आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी जिल्हा परिषद प्रशासनाची राहील, असा इशाराही पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

## वीज चोरीप्रकरणी भंडाऱ्यात गुन्हा दाखल

**भंडारा पत्रिका/प्रतिनिधी**

**भंडारा :** वीज बिल थकीत असल्याने वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित केलेला असतानाही अनधिकृतपणे वीज जोडणी करून वापर केल्याप्रकरणी भारत रामदास देशकर (४५, रा. भगतसिंग वार्ड, टाकळी, भंडारा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. महावितरणच्या पथकाने १० जुलै रोजी तपासणी केली असता आरोपी सर्व्हिस वायरचा आकडा टाकून वीज वापरताना आढळून आला. पंचनामा व जप्तीची कारवाई करून त्याला ९ हजार ६४० रुपये वीजचोरीचा दंड भरण्याची सूचना करण्यात आली होती. मात्र, दंड न भरल्याने सहाय्यक अभियंता जगदिश मते यांच्या तक्रारीवरून भंडारा पोलिसांनी विद्युत कायद्यान्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोहवा रणदिवे करीत आहेत.

## मोटारपंप व ट्रॅक्टरच्या बॅटऱ्या चोरणारे तिघे पोलिसांच्या जाळ्यात

गोबरवाही पोलिसांची कारवाई; २४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त



**भंडारा पत्रिका/वार्ताहर**

**गर्रा-बघेडा :** गोबरवाही पोलीस ठाणे हद्दीत मोटारपंप, ट्रॅक्टरच्या बॅटऱ्या व तांब्याची चोरी करणाऱ्या तिघांना पोलिसांनी अटक केली. या कारवाईत पोलिसांनी एक मोटारपंप, दोन ट्रॅक्टरच्या बॅटऱ्या तसेच अंदाजे पाच किलो तांबे असा एकूण २४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

गोबरवाही पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अपराध क्रमांक ४१८/२०२६, कलम ३०३(२) BNS अंतर्गत तपासादरम्यान पोलिसांनी राहुल लालचंद नागपुरे (वय २१), हर्षद कुमार संजय नागपुरे (वय १८) आणि रामप्रसाद लेकचंद नागपुरे (वय २८), तिघेही रा. आष्टी, ता. तुमसर यांना अटक केली.

आरोपींकडून ३ हजार रुपये किमतीचा एक मोटारपंप, १६ हजार रुपये किमतीच्या दोन ट्रॅक्टरच्या बॅटऱ्या आणि अंदाजे ५ हजार ५०० रुपये किमतीचे पाच किलो तांबे, असा एकूण २४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला.

अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता त्यांच्या पोलीस कोठडीत आणखी दोन दिवसांची वाढ (PCR) करण्यात आली आहे. चोरीच्या या प्रकरणाचा पुढील तपास गोबरवाही पोलीस करीत आहेत.




## अकॅडमिक हाईट्स पब्लिक स्कूल, साकोली येथे आजोबा-आजी दिन उत्साहात साजरा

**भंडारा पत्रिका/प्रतिनिधी**

**साकोली :** अकॅडमिक हाईट्स पब्लिक स्कूल, साकोली येथे बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी आजोबा-आजी दिन मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्ले ग्रुप, नर्सरी, के.जी-१, के.जी.-२ तसेच इयत्ता १ ली व २ री मधील विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या आजी-आजोबांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित आजी-आजोबांचे प्रेमपूर्वक स्वागत करून करण्यात आली. के.जी.१, के.जी २ च्या विद्यार्थ्यांनी नृत्य, विद्यार्थ्यांचे विशेष स्किट आणि शिक्षकांचे गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे आजी-आजोबांनी आपल्या नातवंडांसोबत केलेले नृत्य. तसेच आजी-आजोबांसाठी विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले. आजी-आजोबांनी आपल्या अनुभवांमधून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले व मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना आपल्या आजी-आजोबांप्रती प्रेम,आदर, कृतज्ञता आणि कौटुंबिक मूल्यांची जाणीव झाली. सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा दिवस आनंददायी आणि अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ए.एच.पी.एस.साकोली चे सर्व शिक्षक, विद्यार्थी ह्यांनी पालक आणि आजी-आजोबांचे मनःपूर्वक अभिनंदन करून आभार मानले.

## रामटेक-तुमसर टाउन रेल्वे मार्गाला गती द्या

### भारतीय यात्री केंद्राचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना निवेदन

**भंडारा पत्रिका/वार्ताहर**

**गर्रा बघेडा :** रामटेक ते तुमसर टाउन या प्रस्तावित नवीन रेल्वे मार्गाच्या कामाला गती देऊन प्रलंबित प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, अशी मागणी भारतीय यात्री केंद्राच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी भारतीय यात्री केंद्राच्या पदाधिकाऱ्यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.



भारतीय यात्री केंद्राला प्राप्त माहितीनुसार, रामटेक ते तुमसर टाउन नवीन रेल्वे मार्गाच्या बांधकामासाठी ३१ मार्च २०१६ रोजी सर्वेक्षण अहवाल रेल्वे बोर्ड, नवी दिल्ली येथे पाठविण्यात आला होता. प्रस्तावित रेल्वे मार्गाची लांबी सुमारे ४६.५० किलोमीटर असून त्यासाठी अंदाजे ५४८.०१ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याची माहिती जनशिकायत क्रमांक २१-२२/३०४, दिनांक १६ मार्च २०२२ अन्वये भारतीय यात्री केंद्र, तुमसरला देण्यात आली होती.

या पार्श्वभूमीवर रामटेक (नागपूर जिल्हा) आणि तुमसर परिसराच्या प्रादेशिक विकासाच्या दृष्टीने या रेल्वे मार्गाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. प्रस्तावित रेल्वे मार्गामुळे प्रवासी वाहतुकीसोबतच परिसरातील मॅंगनीज व तांबे यांसारख्या खनिजांच्या वाहतुकीसाठी भविष्यात मालवाहतूक कॉरिडॉर विकसित होण्यास मदत होऊ शकते, असा मुद्दाही निवेदनातून मांडण्यात आला.

या संदर्भात भारतीय यात्री केंद्राची विशेष सभा मोहननगर येथील निवासस्थानी मुख्य सचिव बसंत कुमार शुक्ला यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेत रामटेक-तुमसर टाउन नवीन रेल्वे मार्गाच्या कामाला गती देण्यासाठी केंद्रीय पातळीवर पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार भारतीय यात्री केंद्राचे मुख्य सचिव बसंत कुमार शुक्ला, विभागीय सचिव हरिराम गुप्ता, दिलीप फतेहपुरिया, जगदीशसिंह चंडोक, तुमसर शाखेचे सचिव सीताराम जोशी वल्लभ, अध्यक्ष बेनिश्याम खंडेलवाल आणि उपाध्यक्ष खुशाल नागपुरे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेऊन निवेदन सादर केले.

निवेदनाची दखल घेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या विषयाची गंभीर दखल घेऊन रेल्वे मंत्रालयाला याबाबत अवगत करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती भारतीय यात्री केंद्राच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

रामटेक-तुमसर रेल्वे मार्ग प्रत्यक्षात आल्यास या भागातील प्रवासी वाहतूक, व्यापार, उद्योग आणि खनिज वाहतुकीला चालना मिळण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे या प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत आदर्श हायस्कूल पारडीच्या विद्यार्थ्यांनी मारली बाजी



**भंडारा पत्रिका/वार्ताहर**

**पारडी :** लाखांदूर तालुकास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत आदर्श हायस्कूल पारडीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विविध क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याचे आणि मेहनतीचे उत्कृष्ट प्रदर्शन करीत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात भर घातली.

सदर मैदानी स्पर्धेमध्ये कु.कोमल रविंद्र सोनवाने वयोगट १७ मध्ये थाळीफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक आणि वैष्णवी आंबेडारे द्वितीय क्रमांक, गौरव किशोर कन्नाके वयोगट १४ मध्ये लांबउडी आणि १०० मीटर धावणे स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक, कु. ऋतुजा प्रमोद कन्नाके वयोगट १४ मध्ये १०० मीटर धावणे स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक, कु.अंजली मेश्राम, कु. भाग्यश्री कन्नाके कु. ईशा लाडे कु. ऋतुजा कन्नाके वयोगट १४ मध्ये १००/४ रिले स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक, कु. ईशा लाडे वयोगट १४ मध्ये थाळीफेक स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक, समर नान्हे वयोगट १७ मध्ये ११० मीटर hurdles स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक

पटकावून जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेसाठीपात्र झाले आहेत. कठोर सराव, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी करून यश मिळविले.

या यशाबद्दल शाळेचे माजी मुख्याध्यापक सुनील भोवते, मुख्याध्यापक विकास शिवरकर, क्रीडा शिक्षक अजित उके, नरेंद्र गडपायले, अनिल मदनकर, गिरीश आरीकर, प्रेरणा भोवते, मीना भुरे, सविता ताराम, अनिल गडपायले, आदित्य उके, गोलु लोणारे, शिक्षकवृंद तसेच पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन व नियमित सरावाचा मोठा फायदा झाला.

'खेळातून शिस्त, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुणांचा विकास होतो,' असे मत व्यक्त करत शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सेवा संकल्प अभियानातून युवकांना रोजगार, कौशल्य विकास व उद्योजकतेचे मार्गदर्शन

विविध शासकीय योजना व उपक्रमांची जनजागृती; ७१७ विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सहभाग

**भंडारा पत्रिका/प्रतिनिधी**

**लाखनी :** 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, भंडारा यांच्यामार्फत युवक-युवतींमध्ये रोजगार, कौशल्य विकास व उद्योजकतेबाबत जनजागृती करण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून विविध शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती देऊन मार्गदर्शन करण्यात येत आहे.



या उपक्रमांतर्गत समर्थ विद्यालय, लाखनी तसेच लेट. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाखनी येथे मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आले. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने अमित मलोडे, लिपिक-टंकलेखक यांनी विद्यार्थ्यांना विविध शासकीय योजना व उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी सेवायोजन कार्ड वेबपोर्टलवर नाव नोंदणी, रोजगारासाठी सहकार्य, रोजगार मेळावे, अल्प मुदतीचे कौशल्य विकास प्रशिक्षण, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, सेवा-सोसायटी नोंदणी, करिअर ग्रंथालय सदृश अभ्यासिका, उद्योजकतेशी संबंधित नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच इनक्युबेशन सेंटर याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. युवकांनी उपलब्ध शासकीय सेवा व योजनांचा लाभ घेऊन रोजगार, कौशल्य विकास, प्रशिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या संधींचा उपयोग करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

समर्थ विद्यालय, लाखनी येथे ३३७ विद्यार्थी-विद्यार्थिनी, तर लेट. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाखनी येथे ३८० विद्यार्थी-विद्यार्थिनी, असे दोन्ही कार्यक्रमांना एकूण ७१७ विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमांचे आयोजन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,भंडारा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या उपक्रमातून युवकांमध्ये कौशल्य विकास, रोजगार, प्रशिक्षण आणि उद्योजकतेच्या विविध संधींबाबत जागरूकता निर्माण करण्यास मदत झाली.

दैनिक भंडारा पत्रिका भंडारा हे वृत्तपत्र, प्रकाशक, मालक, मुद्रक श्रीमती कल्पना रमेश चेटुले यांनी राकेश प्रिंटींग प्रेस, राजीव गांधी चौक (तकिया वार्ड), साई मंदिरासमोर, भंडारा येथे मुद्रीत करुन राजीव गांधी चौक (तकिया वार्ड), साई मंदिरसमोर भंडारा येथे प्रकाशित केले आहे. आरएनआय नोंदणी क्र. - ६७५५५/९६ ❖ Mo.9423413190 ❖ संस्थापक संपादक स्व.रमेश म.चेटुले ❖ संपादक - राकेश आनंद चेटुले (दैनिक भंडारा पत्रिका मध्ये प्रकाशित होणाऱ्या लेख, बातमी, स्तंभलेखन आदींना संपादक सहमतच असेल असे नाही. न्यायालयीन प्रकरणांचा वाद भंडारा न्यायालयातून चालविण्यात येईल.)